राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवाल क्रमांक १७ नुसार राज्याच्या इतर मागासवर्ग, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये नव्याने जाती समाविष्ट करणे व वगळणेबाबत....

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: सीबीसी.१०/२००६/प्र.क्र.८५/मावक-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई:४०० ०३२,
दिनांक : ५ ऑक्टोबर, २००६

वाचा:- १. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१३६१/म, दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१
२. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६७/म, दिनांक १३ ऑक्टोबर १९६७,
३. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक : सीबीसी १०९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५
४. शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक : सीबीसी १०९८/प्र.क्र. १८५/इमाव-५, दिनांक १ जानेवारी, २००१
५. शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक : सीबीसी १०९८/प्र.क्र. १८५/इमाव-५, दिनांक १४ फेब्रुवारी, २००१
६. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी १४/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दिनांक : १ जून, २००४
७. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी १४/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दिनांक : २ जून, २००४
८. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग, क्रमांक:सीबीसी.१०९१/२०८४८/(१७१)/मावक-५, दिनांक : २४ सप्टेंबर, १९९१ चे शासन पत्र.
९. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:सीबीसी. १०/२००२/प्र.क्र.१११/मावक-५, दिनांक २८ सप्टेंबर, २००४ चे शासन पत्र.
१०. राज्य मागासवर्ग आयोगाचे पत्र क्रमांक -समाआपु/गोप.अ.६-१३/लो.गाडीलो/०४-०५, दिनांक ४.०२.२००५
११. राज्य मागासवर्ग आयोगाचे पत्र क्रमांक -समाआपु/गोप.अ.६-१६/१३ प्रकरणे /-०५-०६/७१२, दिनांक १८.०८.२००५

१२.राज्य मागासवर्ग आयोगाचे पत्र क्रमांक -रामाआ/१७ वा अहवाल/०५-०६/६४/ दिनांक १५.०२.२००६

१३.शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक - सीबीसी-१०/२००५/प्रक्र.८२/मावक-५/ दिनांक १ मार्च, २००६

१४.शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक - सीबीसी-१४/२००५/प्रक्र.८२/मावक-५/ दिनांक २१ मार्च, २००६

प्रस्तावना :- विमुक्त जाती / भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या याद्या शासनाने वरील अनुक्रमाक १, २, ३ या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केल्या आहेत व त्यात वेळोवेळी सुधारणाही करण्यात आलेल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने इंदर सहानी व इतर विरुध्द भारत सरकार व इतर यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये समावेश करण्यासाठी व वगळण्यासाठी आलेल्य मागण्या व तक्रारीबाबत तपासणी आणि शिफारस करण्यासाठी शासनाने राज्य मागासवर्ग आयोग गठीत केला आहे. या आयोगाने यापूर्वीच शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींनुसार वरील जातींच्या यादीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाने सन २००६ मध्ये शासनास सादर केलेल्या १७व्या अहवालातील शिफारशींनुसार काही जातींचा समावेश भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या यादी करणे व काही जातींचा इतर मागासवर्गाच्या यादीतून वगळणे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या १७व्या अहवालातील शिफारशींनुसार खालील "अ" व "ब" येथील जाती / तत्सम जातींचा इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये समावेश करण्यास, "क" येथील जाती / तत्सम जातींचा विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये समावेश करण्यास, "ड" येथील जाती / तत्सम उप जातींचा भटक्या जमातीच्या यादीमध्ये समावेश करण्यास व "इ" येथील जाती तत्सम जातींचा इतर मागासवर्गाच्या यादीतून वगळण्यास शासना मान्यता देत आहे.

अ) राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास केलेल्या शिफारशीनुसार खालील जातींचा नव्याने इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

| अ. क्र. | जातीचे नांव |
|---|---|
| ३४२ | नेवेवाणी, |

ब) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार खालील तत्सम उपजातींचा इतर मागासवर्गींच्या यादीतील मूळ जातीसमोर समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | इतर मागासवर्ग प्रवर्गातील मूळ जात व अनुक्रमांक | नव्याने समावेश करण्यात आलेली तत्सम जात / उपजात व तिच्या मूळ जातीचा अनुक्रमांक |
|---|---|---|
| १ | भांड, छप्परभांड, - ८ | मुस्लीम भांड -८ |

| | | |
|---|---|---|
| २ | जिनगर -५९ | चितारी-जिनगर -५९ |
| ३ | मानभाव-९४ | महानुभाव भोपी, मानभाव भोपी -९४ |
| ४ | कलाल, कलार, लाड, लाडवक, गौड कलाल, शिव्हारे - २५४ | जैन कलार -२५४ |

क) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार खालील जातीचा विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये नव्याने समावेश करण्यात येत आहे.

| अनुक्रमांक | जातीचे नांव |
|---|---|
| ६ | गाबीत |

ड) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार खालील तत्सम उप जातींचा भटक्या जमातींच्या यादीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | भटक्या जमातीच्या यादीतील अनुक्रमांक | नव्याने समाविष्ट केलेल्या तत्सम जाती / उपजाती व अनुक्रमांक |
|---|---|---|
| १ | भोई - २५ | भनारा, भनारी, भनारे - २५ (२६) |

इ) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार खालील जातींना इतर मागासवर्गातून वगळण्यात येत आहे.

| अनुक्रमांक | इतर मागासवर्गाच्या यादीतून खालील अनुक्रमांकावरील वगळण्यात आलेल्या जातीचे नाव |
|---|---|
| १ | अ.क्र. २०१ - गाबीत |

३. राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशींनुसार नव्याने भटक्या जमाती, इतरमागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या जाती / जमाती / तत्सम जातींना शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून जातीचे देय असलेले फायदे लागू होतील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर दर्शविण्यात आला असून याचा संगणक संकेतांक २००६१०१९१५५३२०००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ना. ना. भडीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने),
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,

महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व उप विभागीय अधिकरी ( महसूल)
तथा उप विभागीय दंडाधिकारी,
सर्व तालुका कर्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधंक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ- औरंगाबाद,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - औरंगाबाद,
संचालक समाजकल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, प्राथमिक शिक्षण ,महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना हयाबाबतच्या सूचना द्याव्यात.

सर्व विभागीय समाजकलयाण अधिकारी/ सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, का- मावक- ५